
मदर जोन्स

ची गोष्ट



रचेल ए. कोसलर-ग्रेक

मराठी : वंदना पलसाने

मदर जोन्स

ची गोष्ट



रचेल ए. कोसलर-ग्रेक

मराठी : वंदना पलसाने

अनुक्रमणिका


बालकामगार

मेरी जोन्स १८९४ साली अलाबामा राज्यातील एका कापड गिरणीत गेल्या. त्या तिथे गुप्तपणे गिरणीमधील कामाच्या परिस्थितीचे निरीक्षण करण्यासाठी गेल्या होत्या. तिथे मेरी यांनी लहान मुली आणि मुलांना तुटलेले कापसाचे धागे जोडण्यासाठी अवजड मशीनींमध्ये आपले छोटे छोटे हात घालताना पाहिले. कडक होऊन अडकलेल्या बिजागऱ्यांना तेल घालण्यासाठी ही मुले ऑईल कॅन घेऊन मशिनींच्या खाली रांगत जात होती. हे काम खूपच धोकादायक होते. मशिनी वेगाने चालत असत. "अनेकदा मुलांचे हात चिरडले जात, बोटे तुटून पडत", मेरीने नंतर लिहिले.


बाहेर स्वच्छ सूर्यप्रकाश आणि निळेभोर आकाश मुलांना खुणावत असे.

"जास्त पैसा मिळवण्याच्या हेतूने अधिक मुले जगात आणण्याचा उपयोग काय... जर त्यांचे छोटे आयुष्य गिरण्या आणि कारखान्यांमध्येच पिळून निघणार असेल तर!"

\- मदर जोन्स



बरीच मुले कारखान्यांमध्ये मशिनींसोबत काम करत असत. सोबतच्या चित्रात दोन मुले बॉबिन बदलताना दिसत आहेत.



कारखान्यांमध्ये मुले खूप अधिक तास अतिशय कमी वेतनावर काम करत. मुले इतकी थकून जात की जेवणाच्या सुट्टीत खेळण्याऐवजी विश्रांती घेत.

परंतु, जेवणाच्या सुट्टीच्या वेळी मुले इतकी थकलेली असत, की त्यांना खेळणे शक्य नव्हते. मक्याच्या भाकरी आणि सुके डुकराचे खारे मांस (ज्याला "फॅटबॅक" म्हणत), खाऊन ती झोपून जात. अर्ध्या तासाची सुट्टी संपल्यावर मालक त्यांना हलवून जागे करी आणि उरलेली दुपार आणि संध्याकाळ ही मुले अंधाऱ्या गिरणीत काम करत घालवत. दिवस अखेर त्यांना दिवसाची मजुरी फक्त १० सेंट एवढी मिळत असे. मेरीने लिहिले, "मी जाहीर करते की ही लहान-लहान आयुष्ये त्यांनी विणलेल्या सुती कपड्यांमध्ये विणली गेली आहेत".

मेरीला वयस्क मजुरांना चांगली कामाची परिस्थिती मिळावी म्हणून लढण्याची सवय होती. आता तिला बालमजुरांना त्यांच्या हक्कासाठीच्या संघर्षात मदत करायची होती. "मी त्यांना वाचवण्यासाठी कटिबद्ध आहे", मेरीने वचन दिले. चांगली कामाची परिस्थिती आणि योग्य वेतनाच्या मागण्यांसाठी अनेक श्रमिकांना मेरी जोन्सने आयुष्यभर नेतृत्व दिले. सामान्य कामगारांविषयी तिला वाटणाऱ्या कळकळ आणि तळमळीमुळे तिला "मदर जोन्स" हे उपनाम प्राप्त झाले.

अमेरिकेकडे प्रयाण


मेरी हॅरीसचा जन्म १८३७ मध्ये आयर्लंड मधील कॉर्क येथे झाला. पाच भावंडांमध्ये मेरीचा क्रमांक दुसरा होता. त्या काळातील अनेक सर्वसाधारण आयरिश कुटुंबांप्रमाणे मेरीचे कुटुंब ही खूप गरीब होते. मेरीच्या जन्मा आधीच तिचे कुटुंब त्यांचे गावाकडील घर सोडून शहरात स्थलांतरित झाले होते.

मेरीचे वडील रिचर्ड हॅरीस आणि आई मेरी यांची इच्छा होती की त्यांचे आणि मुलांचे जीवनमान सुधारावे. जेव्हा लहानगी मेरी १० वर्षांची होती, तेव्हा तिचे वडील आणि मोठा भाऊ अमेरिकेला गेले. त्यांनी तिथे कष्टाची कामे करून पैसे साठवले. १८५० च्या सुरुवातीच्या काळात, मेरीचे वडील रेलरोड बांधकाम करणाऱ्या कंपनीत कामाला होते आणि त्यांनी आपल्या कुटुंबाला उत्तर अमेरिकेत आणण्यापुरता पैसा कमावला होता.




आयर्लंडच्या ग्रामीण भागात गरीब लोक गवत आणि चिखल वापरून बनवलेल्या घरांमध्ये रहात. मेरीच्या जन्माच्या आधी तिचे कुटुंब सुद्धा अशाच प्रकारच्या घरात रहात असावे.

मेरी तरुण असताना तिचे कुटुंब कॅनडाला स्थलांतरित झाले. सोबतच्या चित्रात दाखवल्याप्रमाणे अत्यंत गर्दी असलेल्या जहाजांमधून युरोपातील स्थलांतरित समुद्र ओलांडून उत्तर अमेरिकेकडे जात.



मेरीचे कुटुंब कॅनडात आल्यावर टोरोंटो शहरात स्थायिक झाले. तिथे किशोरवयीन मेरीने पब्लिक स्कूल मधून शिक्षण घेतले. मेरी हुशार विद्यार्थिनी होती. तिची अभ्यासातील प्रगती चांगली होती. घरी, मेरी आपल्या आईला घरकामात मदत करीत असे. तिने शिवणकाम शिकून घेतले. कुटुंबाला अर्थसहाय्य करण्यासाठी, ती शेजाऱ्यांचे आणि मित्रांचे कपडे शिवत असे. १८५७ मध्ये जेव्हा ती २० वर्षांची होती, मेरीने टोरोंटो नॉर्मल स्कूल मध्ये प्रवेश घेतला. येथे तिने शिक्षक होण्यासाठीचे प्रशिक्षण घेतले. शिक्षण क्षेत्रातील नोकरी ही त्या काळी स्त्रियांना उपलब्ध असलेल्या अत्यंत कमी संधींपैकी एक होती. मेरीने तिथे एक वर्ष प्रशिक्षण घेतले, जे टोरोंटो मध्ये शिक्षक म्हणून काम मिळवण्यासाठी पुरेसे होते.



शिवणकाम हा १८०० च्या दशकात स्त्रियांसाठी एक उपलब्ध व्यवसाय होता. गरीब स्त्रिया श्रीमंत स्त्रियांसाठी वस्त्रे शिवून थोडे फार अतिरिक्त पैसे कमवू शकत होत्या.


मेरी मात्र साहसासाठी उत्सुक होती. १८५९ मध्ये तिने घर सोडले आणि ती मिशिगन येथील मनरो येथे शिक्षिका म्हणून रुजू झाली. १८६० च्या सुरुवातीला ती शिकागो, इलिनॉयला गेली आणि ड्रेसमेकर बनली. वर्षाच्या शेवटी तिने पुन्हा स्थलांतर केले आणि ती मेम्फिस, टेनेसी येथे जाऊन पुन्हा शिक्षक बनली.

मेम्फिस मध्ये मेरीची भेट जॉर्ज जोन्स यांच्याशी झाली आणि तिने त्यांच्याशी लग्न केले. जॉर्ज लोखंड या धातूच्या ओतकामाचे काम करी. तो लोखंडाच्या वस्तू बनवणाऱ्या आणि त्यांची दुरुस्ती करणाऱ्या कारखान्यात काम करी. मेरी आणि जॉर्ज ने शहरातील गरीब वस्तीमध्ये भाड्याने घर घेतले. त्यांचे बहुतेक शेजारी कारखाने आणि गिरण्यांमध्ये काम करीत. त्यांचे वेतन खूप कमी होते आणि त्यांना जगण्यासाठी खूप संघर्ष करावा लागे.


जॉर्ज चे मत होते की कामगारांना अधिक चांगल्या सोयी सुविधा मिळाल्या पाहिजेत. तो 'इंटरनॅशनल आयरन मोल्डर्स युनिअन' चा सभासद आणि खंदा समर्थक होता. युनिअनने अधिक चांगले वेतन आणि चांगल्या कामाच्या परिस्थितीची मागणी करणाऱ्या आयरन मोल्डर्सना संघटित केले होते. संघटित होऊन ते मालकांवर आपल्या मागण्यांसाठी दबाव निर्माण करत. इतर व्यवसायातील कामगारांनी सुद्धा योग्य सोयी सुविधांच्या मागण्यांसाठी अशाच युनिअन बनवल्या होत्या.

मेरी आणि जॉर्जना भरपूर संघर्ष करावा लागला, पण त्यातून त्यांनी स्वत:साठी चांगले आयुष्य उभे केले. लवकरच त्यांना चार मुले झाली. अतिशय आनंदाने मेरी आपल्या मुलांची आणि घराची देखभाल करत असे. रात्री, ती जॉर्ज कडून आयरन मोल्डर्स युनिअनच्या कामाविषयी ऐकत असे. एकत्रितपणे, मेरी आणि जॉर्ज त्यांच्या आणि मुलांच्या सुखकर आयुष्याचे स्वप्न बघत.

पोलाद कारखान्यांमध्ये प्रचंड गर्दी असे आणि तिथली कामाची परिस्थिती खूप अवघड होती. अधिक वेतन आणि चांगल्या कामाच्या परिस्थतीसाठी मालकांवर दबाव आणण्याच्या उद्देशाने कामगार संघटना बांधत.



सर्वस्व गमावले



१८६० च्या दशकात दक्षिणेत 'यलो फीवर' या रोगाच्या साथीने लोकांना ग्रासले. या साथीत श्रीमंत, गरीब सगळेच बळी पडू लागले. सोबतच्या चित्रातील एका श्रीमंत घरातील मुलगी कुटुंबातील सर्व सदस्यांच्या यलो फीवर ने मृत्यू झाल्यानंतर एकटीच घरात खेळत आहे.

१८६७ साली ही साथ मेम्फिस शहरातही पसरली. मेम्फिसचे नागरिक घाबरून गेले. श्रीमंत कुटुंबांनी शहर सोडून ग्रामीण भागांकडे पलायन केले. पण गरिबांकडे जायला कुठेही जागा नव्हती.

जोन्स रहात होते त्या सर्व भागाला सुद्‌धा साथीच्या रोगाने मोठ्या प्रमाणावर ग्रासले होते. मेरी, जॉर्ज आणि त्यांची मुले स्वत:च्याच घरी राहिली. रोगाने पीडित झालेल्या शेजाऱ्यांचे रडणे-ओरडणे त्यांना ऐकू येत असे. रोज रात्री, एक घोडागाडी त्यांच्या घरासमोरील रस्त्यावरून जात असे. त्या वेळी कुटुंबे आपल्या घरातील मृत व्यक्तींना त्यात नेऊन ठेवत असत. मेरी आठवण सांगते, “मृत्यू ने आम्हाला घेरले होते. रात्रीतल्या रात्रीत प्रेतांना कोणत्याही क्रियाकर्मा शिवाय पुरले जाई. माझ्या घराच्या भोवताली सगळी कडे मला रडणे ऐकू येई.”

आणि मग या भयंकर आजाराने जोन्स कुटुंबावर हल्ला केला. तिची चारही मुले आजारी पडली. तिने त्यांची कातडी पिवळी पडताना पाहिली. ताप जसा वाढत चालला, तशी ती त्यांचे केस हळुवारपणे नीट करी. मुलांना पुन्हा पुन्हा रक्ताच्या उलट्या होत. पुढच्या काहीच दिवसात, चारही मुले दगावली. नंतर जॉर्ज पण आजारी पडला आणि मृत्यू पावला.

“मी अमेरिकेत राहते पण नेमकी कुठे राहते मला सांगता येणार नाही... माझा पत्ता माझ्या बुटांसारखा आहे, तो मी जाईन तिथे माझ्यासोबत प्रवास करतो”.
- मदर जोन्स

एका आठवड्याच्या आत मेरीने तिचे संपूर्ण कुटुंब गमावले होते. “रात्रीच्या रात्री मी दु:ख्खी अवस्थेत एकटीने घालवल्या”, तिने नंतर लिहिले. “माझ्यापाशी कुणी आले नाही. कुणी येऊच शकत नव्हते. प्रत्येक कुटुंबाची अवस्था माझ्यासारखीच होती”. आपल्या अंधाऱ्या आणि शांत घरात बसून मेरी विचार करत असे की ती का नाही आजारी पडली? तिचे पूर्ण कुटुंब यलो फीवर ने आजारी पडून मृत्यू पावले. पण ती जगली. तिने ठरवले की ती इतरांना मदत करण्यासाठीच जिवंत राहिली आहे.

१८६८ च्या हिवाळ्यात मेरी जोन्स शिकागोला परत आली आणि तिने पुन्हा कपडे शिवण्याचा व्यवसाय सुरु केला. तिचे बरेचसे ग्राहक श्रीमंत वर्गातील होते.

१८०० च्या दशकाच्या शेवटापर्यंत, अमेरिकन शहरांमध्ये कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांची गर्दी होऊ लागली होती. मेरी ज्यांचे कपडे शिवत असे त्या श्रीमंत घराण्यातील स्त्रिया आणि ती ज्यांच्यासोबत राहत होती त्या लोकांमध्ये खूप मोठा फरक होता.



१८७१ मध्ये शिकागो शहरात ती प्रचंड आग पसरली, जिने अनेक इमारतींना जाळून भस्मसात केले.



मेरीने नंतर आठवण सांगितली, “मी जेव्हा लेक शोर ड्राईव्ह वर अत्यंत दिमाखदार घरांमध्ये राहणाऱ्या श्रीमंत श्रेष्ठीजनांचे कपडे शिवत असे, त्यांच्या मोठमोठ्या काचेच्या खिडक्यांमधून मला गरीब, कुडकुडणारे, बेरोजगार आणि भुकेले लोक तलावाच्या काठी चालताना दिसत असत.” ही श्रीमंत आणि गरिबांमधली दरी मेरीला क्षुब्ध करत असे. काही लोकांकडे इतका अधिक पैसा आणि काहींकडे अपार कष्ट करूनही इतका कमी की त्यांना आपले पोटही भरता येऊ नये, याचे तिला नेहमी आश्चर्य वाटे.

१८७१ मध्ये, शिकागो मध्ये आग पसरली. “ग्रेट शिकागो फायर” या नावाने प्रसिद्ध या आगीने मेरीच्या ड्रेसमेकिंगच्या व्यवसायाला नष्ट केले. तेव्हा ती ३४ वर्षांची होती, आणि तिला पुन्हा एकदा एक नवी सुरुवात करावी लागणार होती. मेरीने लवकरच कामगारांच्या संघर्षामध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. तिला कामगारांना आपले जीवनमान सुधारण्यामध्ये मदत करायची होती. खाणकामगार, कारखान्यातील मजूर, आणि गिरणी कामगार नेहमीच अतिशय घाणेरड्या आणि धोकादायक परिस्थितीत काम करत. मालकवर्ग आपल्या कर्मचाऱ्यांना जितके शक्य होईल तितके कमी वेतन देत असत.



मेरी तिच्या “मातृतुल्य” दिसण्यावरून ओळखली जाई. ती नेहमी एक लांब काळा पोशाख घालत असे आणि तिचे केस मागे एका नीट-नेटक्या आंबाड्यात बांधलेले असत.

१८८० च्या दशकाच्या जवळपासचा काळ असावा जेव्हा मेरीने “नाईट्स ऑफ लेबर” या संघटनेच्या रात्रीच्या बैठकांमध्ये सहभागी होण्यास सुरुवात केली. त्या काळी ही संघटना अमेरिकेतील सर्वात मोठी कामगार संघटना होती. तिथे तिने अमेरिकेतील कामगारांसाठी उचित वेतनमान आणि चांगल्या कामाच्या परिस्थितींच्या आवश्यकतेविषयी अनेक प्रेरक भाषणे ऐकली. संघर्षासाठी उत्सुक मेरी लवकरच या युनिअन मध्ये सामील झाली.

मेरी ““नाईट्स ऑफ लेबर” मध्ये सर्वांमध्ये वेगळी उठून दिसे. तिथे स्त्रियांचे स्वागत होते परंतु स्त्री सदस्य खूपच कमी होत्या. वयाच्या चाळीशीच्या सुरुवातीला मेरीने लांब काळा पोशाख घातला, ज्याला लेस आणि जांभळ्या मखमलीची किनार होती. तिने आपले पांढरे केस आंबाड्यात बांधले होते. तिचे साधे, “मातृतुल्य” दिसणे आणि उत्कृष्ट वक्तृत्व यांनी संघटनेच्या इतर सभासदांचे लक्ष वेधले. लवकरच सगळे तिचा आदर करू लागले. लोकांनी पाहिले की मेरीच्या मातृतुल्य उपस्थिती मागे एक अत्यंत प्रभावशाली स्त्री आहे, जी कामगाराचे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध आहे.


महान रेल्वेमार्ग संप

१८७३ मध्ये, अमेरिकेची आर्थिक स्थिती अतिशय कठीण संकटात सापडली होती. देश मंदीच्या गर्तेत होता. अनेक कामगारांच्या नोकऱ्या गेल्या होत्या, आणि त्यांची कुटुंबे गरीब, भुकेली आणि बेघर झाली होती. रेल्वेमार्ग कर्मचारी आपल्या नोकऱ्या टिकवून होते, पण त्यांचा कामाचा दिवस लांबत चालला होता आणि वेतन कमी, कमी होत चालले होते.

जुलै १८७७ मध्ये, मुख्य चार रेल्वेमार्ग कंपन्यांच्या प्रमुखांनी त्यांच्या कामगारांच्या वेतनामध्ये १० टक्क्यांनी कपात करण्याचे ठरवले. हा कामगारांसाठी शेवटचा धक्का होता. पश्चिम वर्जिनियाच्या रेल्वेमार्ग कामगारांनी सर्वप्रथम काम थांबवले. लवकरच हा संप ठिकठिकाणच्या अनेक रेल्वे लाईन्स पर्यंत पसरला, इतका की देशाने पाहिलेल्या आता पर्यंतच्या सर्वात मोठ्या संपात परिवर्तित झाला. सर्व मिळून, विविध पार्श्वभूमी असलेले जवळ जवळ एक लाख कामगार - स्त्रिया आणि पुरुष, काळे आणि गोरे - संपावर गेले. काही शहरांमध्ये, संप हिंसक सुद्धा झाले, दंगली झाल्या. हा रेल्वेमार्ग कर्मचाऱ्यांचा संप केवळ दोन आठवडे चालला पण त्यात १०० माणसे दगावली आणि अनेक जखमी झाले. शेवटी, शासनाने हस्तक्षेप केला आणि रेल्वेमार्ग कंपन्यांची बाजू उचलून धरली.

या संपाने मेरी जोन्सवर मोठा प्रभाव पाडला. कामगारांनी शासनाला आणि व्यावसायिक नेत्यांना कडक संदेश दिला होता की आता ते अन्याय आणि गैरवर्तनाला कंटाळले आहेत. मेरीला आता विश्वास वाटू लागला की अधिक संघटित झाले तर संपकरी कामगार अमेरिकेमध्ये कामगारांची भूमिका बदलू शकतात.

मार्टिन्सबर्ग, पश्चिम वर्जिनिया मधील रेल्वेमार्ग कामगार हे १८७७ च्या बाल्टीमोर आणि ओहिओ रेल्वेमार्ग संपातील काम सोडून निघणाऱ्यांपैकी पहिले होते. कधीकधी हे संप दंगलींमध्ये परावर्तित होत.



खाणकामगारांचा विजय


शिकागो आणि इतर शहरांमधील कामगारांनी सुद्धा संप केले. संपाच्या दरम्यान कर्मचारी आपले काम सोडून निघून जात आणि निषेध म्हणून मोर्चे काढत. कंपनी त्यांच्या वेतनात आणि कामाच्या परिस्थितीत सुधारणा करत नाही तोपर्यंत ते कामावर रुजू होण्यास नकार देत. काही संप इतके हिंसक झाले की त्यांना मोडण्यासाठी पोलिस बोलवावे लागले. मेरीने निर्णय घेतला की जर कामगार अधिक चांगल्या प्रकारे संघटित झाले तर ते अधिक चांगले बदल घडवून आणू शकतील.

मेरीने कामगारांच्या बैठकांमध्ये सामील होण्यासाठी देशभर प्रवास करायला सुरुवात केली. या बैठकांमध्ये ती कामगारांसोबत धीम्या आणि स्पष्ट आवाजात बोलत असे, ज्यामुळे कामगारांना प्रेरणा मिळे. ती आपले विचार प्रभावी आणि थेटपणे मांडत असे. तिने नंतर सांगितले, “जनता सर्वाधिक झोपेत असलेला समूह आहे असे दिसते. तिला जागे करणे आवश्यक आहे! त्या नंतर कृती करावी लागेल.” कामगार तिच्या अथक परिश्रमासाठी मेरीचा आदर करत. लहान मुलांसारखे ते तिच्या मागे जात. १८९० च्या दशकापर्यंत येता येता लोक तिला ‘मदर जोन्स’ म्हणू लागले.

मेरीने संपूर्ण देशात प्रवास केला आणि कामगारांच्या बैठकांमध्ये भाग घेतला. तिच्या कडक बोलण्याने कामगारांना कृती करण्याची प्रेरणा मिळाली. ती म्हणत असे, “मृतकांसाठी प्रार्थना करा आणि जिवंत लोकांसाठी प्राणपणाने लढा.”



युनायटेड माईन वर्कर्स (यूएमडबल्यू) ने खाणकामगारांच्या गरजांमध्ये लक्ष घालण्यासाठी युनिअन बनवली. खाणकामगारांना खाण कोसळणे (cave-ins), फुफ्फुसाचे आजार आणि कामाचे खूप जास्त तास अशा अवघड परिस्थितीत काम करावे लागे.



१८९०च्या दशकात मदर जोन्स 'युनायटेड माईन वर्कर्स' या नव्या कामगार संघटनेची सभासद झाली. तिने वेस्ट वर्जिनिया, अलाबामा आणि पेनसिल्वानिया येथील खाणींचा दौरा केला. तिथे तिने खाणकामगार रोज ज्या धोकादायक परिस्थितीचा सामना करतात ती प्रत्यक्ष पाहिली. खाणी जेव्हा कोसळतात तेव्हा मोठाले दगड कामगारांवर येऊन आदळतात. खाणींच्या आत बाहेर कोळसा घेऊन जाणारी मालवाहू गाडी वाटेत आलेल्या कामगाराला चिरडून टाकू शकत असे. काही कामगारांना कोळश्याच्या जाड घट्ट धुरात श्वास घेऊन घेऊन फुफ्फुसाचे आजार झाले होते. खाणकामगार बरेचदा दिवसाला १४ तास, आठवड्याचे ६ दिवस काम करत. तरी, ते जेमतेम जगण्यापुरते कमवीत. अनेक कामगारांना आपल्या कुटुंबांचे भरण-पोषण तोडक्या मोडक्या झोपड्यांमधून करावे लागे.

मदर जोन्सने या कामगारांना युनायटेड माईन वर्कर्स या संघटनेचे सभासद होण्यास सांगितले. तिने त्यांना सांगितले की जर अनेक कामगार संघटित झाले तर संघर्षासाठी ती मोठी शक्ती तयार होईल. खाणकामगार संघटनेचे सभासद झाले आणि त्यांनी वेतन वाढ आणि कामाच्या चांगल्या परिस्थिती साठी संप केला.

“मी लेखणी, तलवार किंवा मचानीला भीत नाही. मी फक्त सत्य सांगेन... जिथे मला योग्य वाटेल तिथे,”
मदर जोन्स

मदर जोन्स कडे संपांचे आयोजन करण्याचे अद्भुत कौशल्य होते. जेव्हा कामगारांनी काम करायचे बंद केले, तेव्हा तिने त्यांच्या कुटुंबांचे पोट भरण्याचे नवनवीन मार्ग शोधले. तिने भाषणे दिली आणि कामगारांचा उत्साह वाढवण्यासाठी अनेक रॅली आयोजित केल्या. कामगार तिला ‘खाणकामगारांची देवदूत’ म्हणत आणि ती त्यांना ‘माझी मुले’ म्हणे. मदर जोन्स ने लहान मुलांच्या मिरवणुकी काढल्या आणि स्त्रियांचे आवाजी मोर्चे काढले. स्त्रियांनी मोर्चात भांडीकुंडी बडवली आणि विरोध करत भरपूर आरडाओरडा केला. आपल्या कुटुंबांसाठी संघर्षात उतरण्याची संधी मिळाल्यामुळे त्या कृतज्ञ होत्या.

अनेक कोळसा कंपन्यांनी पराभव पत्करला, ज्यामुळे खाणकामगारांचे कामाचे तास कमी झाले आणि वेतनवाढ झाली. मदर जोन्सने आपल्या मुलांना दाखवून दिले की संघटित होऊन ते मोठा बदल घडवून आणू शकतात.



मदर जोन्स मध्ये संपूर्ण कुटुंबाला आपल्या उद्दिष्टांसाठी सक्रीय करण्याची क्षमता होती. इथे युएमडबल्यूला पाठिंबा देण्यासाठी स्त्रियांनी काढलेला मोर्चा दिसत आहे.

कामगार चळवळ

औद्योगिक क्रांतीच्या काळात, १८३० च्या दशकाच्या दरम्यान अमेरिकेमध्ये कामगार चळवळ सुरु झाली. या दरम्यान, मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी कामगारांनी विजेवर चालणाऱ्या मशिनी वापरायला सुरुवात केली होती. १८०० च्या दशकाच्या मध्यात, कामगार राष्ट्रीय पातळीवरील कामगार संघटनांमधून संघटित होत होते. काही काळातच, काही प्रभावशाली कामगार संघटना उदयाला आल्या. यांच्यात, नाईट्स ऑफ लेबर, द अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर (AFL), द इंडस्ट्रीयल वर्कर्स ऑफ द वर्ल्ड (IWW), आणि द कॉंग्रेस ऑफ इंडस्ट्रीयल ऑर्गनायझेशन (CIO), यांचा समावेश होता.

कामगार संघटनांनी थोडी प्रगती केली. परंतु, अनेकदा त्यांना अपयशाचा सामना करावा लागला. कधी संप अपयशी झाले तर कधी शासनाने भांडवलदारांची बाजू घेतली. १९३०च्या दशकातील महामंदी दरम्यान मात्र एक महत्वपूर्ण वळण मिळाले, जेव्हा अमेरिकेतील आर्थिक परिस्थिती अतिशय कठीण बनली. अमेरिकनांना वाटले की जर श्रमिकांकडे अधिक पैसा असेल तर ते अधिक वस्तू खरेदी करू शकतील आणि ते अर्थव्यवस्थेला फायदेशीर ठरेल. म्हणून शासनाने व्यावसायिकांपेक्षा कामगारांची बाजू उचलून धरायला सुरुवात केली. कॉंग्रेसने १९३०च्या दशकात नवे कायदे पास केले ज्यांच्यामुळे कामगार संघटनांना संरक्षण मिळून त्या अधिक शक्तिशाली बनल्या.

अमेरिकेच्या कामगार चळवळीने कामगारांना अधिक वेतन, कामाचे योग्य तास आणि कामाची चांगली परिस्थिती मिळवून देण्यास मदत केली आहे. आज, या संघटना अनेक प्रकारच्या कामगारांना संरक्षण देतात, त्यात शिक्षक, परिचारिका आणि नट आहेत. अमेरिकेची सर्वात मोठी आणि शक्तिशाली कामगार संघटना AFL-CIO ही आहे. ही संघटना विविध स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील युनिअन्स साठी काम करते. देशातील जवळपास तीन चतुर्थांश कामगार संघटनांचे सदस्य AFL-CIO बरोबर संबंधित आहेत.

१८३० च्या दशकात उदयाला आलेल्या काही शक्तिशाली कामगार संघटना आजही अस्तित्वात आहेत. AFL-CIO आजही संपाचे हत्यार वापरून मालकवर्गाला श्रमिकांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास भाग पाडते.



मुलांचा मोर्चा

आता 'खाणकामगारांची देवदूत' या नावाने प्रसिद्धी पावलेल्या मदर जोन्स ने कामगारांच्या एका वेगळ्या गटाचा - मुलांचा - प्रश्न पुढे आणला. १९०० पर्यंत, १६ वर्षाखालील जवळजवळ दोन दशलक्ष लहान मुले कापड गिरण्या, कारखाने आणि खाणींमध्ये काम करत होती. मदर जोन्सना खास करून कापड गिरण्यांमध्ये खूप अधिक तास काम करणाऱ्या हजारों मुलांची चिंता वाटत होती. त्यांचे मत होते की मुलांनी शाळेत जाण्यासाठी आणि सूर्यप्रकाशात आणि ताज्या हवेमध्ये खेळण्यासाठी अगदी मुक्त असावे.

जून १९०३ मध्ये, मदर जोन्स फिलाडेल्फिया, पेनसिल्वानिया येथे गेल्या. तिथे गिरणी कामगारांचा संप चालू होता. हा संप त्या भागातील ६०० गिरण्यांमध्ये पसरला होता. कामे सोडून गेलेल्यांमध्ये हजारो मुले होती. संपकर्यांना त्यांचे आठवड्याचे कामाचे तास ६० वरून ५५ पर्यंत कमी करून हवे होते, मग ते पगारात कपात होऊन झाले तरी त्यांना चालणार होते.

१९०० पर्यंत, १६ वर्षाखालील जवळजवळ दोन दशलक्ष मुले कापड गिरण्या, कारखाने आणि खाणींमधून कामाला होती. इथे, कापड गिरणीत एक अगदी लहान मुलगी एका अवजड मशिनी जवळ उभी असलेली दिसते आहे.





कारखान्यांमधून काम करताना लहान मुलांना अनेकदा गंभीर इजा होई. मुले आकाराने लहान असल्यामुळे, त्यांना अतिशय धोकादायक अशा लहानशा ठिकाणी मशीन दुरुस्तीसाठी पाठवले जाई.

या छोट्या कामगारांच्या मदतीसाठी मदर जोन्स यांनी जनसमर्थन उभे करण्याचे नियोजन केले. त्यासाठी त्यांनी फिलाडेल्फियाच्या रस्त्यांवरून मुले आणि त्यांचे पालक यांनी काढलेल्या मोठ्या मोर्च्याचे नेतृत्व केले. तिथे त्यांनी एक भाषण केले. मदर जोन्स यांनी एका मुलाचा हात उंचावला. त्याला एक बोट नव्हते. त्या म्हणाल्या, “फिलाडेल्फियामधील महाल या मुलांच्या मोडलेल्या हाडांवर, थरथरणाऱ्या हृदयांवर आणि झुकलेल्या शिरांवर बनवले गेले आहेत.” परंतु, शहराच्या नेत्यांनी कामगारांची मदत करण्याचे नाकारले.

“या जगाला, गरीब, कष्टकरी लोकांसाठी अधिक चांगली जागा बनवण्यासाठी मी माझ्या परीने करता येतील ते सर्व प्रयत्न केले आहेत”.
मदर जोन्स

मेरीला कळून चुकले की बदल घडवून आणण्यासाठी तिला संपूर्ण देशाचे लक्ष वेधावे लागेल. तिने फिलाडेल्फियापासून ते न्यूयॉर्क शहरापर्यंत मार्च करत जाण्याची योजना बनवली. ती म्हणाली, “मी वॉलस्ट्रीट ला दाखवून देणार आहे की त्यांची संपत्ती कुणाच्या मांस आणि रक्तातून पिळून काढली गेली आहे”. हा मार्च जवळजवळ १०० मैल (१६० किलोमीटर्स) इतका लांब असणार होता आणि राष्ट्राध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांच्या ग्रीष्मकालीन घराजवळ संपणार होता.



मदर जोन्सने जेव्हा आपला पायी मार्च आयोजित केला होता तेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट होते. त्यांच्या सचिवाने मदर जोन्सना सांगितले की राष्ट्राध्यक्ष त्यांच्या कार्यात त्यांची कोणतीही मदत करू शकत नाहीत.

७ जुलै, १९०३ रोजी मदर जोन्स यांनी १०० मुले आणि मुली, आणि अनेक वयस्क कामगार आणि कामगार नेते, यांच्या सोबत पायी मार्च सुरु केला. उन्हाळ्यात धुळीने माखलेल्या रस्त्यांवर चालून मुलांचे पाय सुजून आले. काही मोर्चेकरी घरी परतले.


मोर्चेकऱ्यांनी गाणी गायली आणि झेंडे फडकवले. मुलांच्या हातात लाकडी बोर्ड होते, ज्यांच्यावर लिहिले होते “आम्हाला खेळायला वेळ हवा” आणि “आम्ही फक्त न्याय मागत आहोत”. हा गट, ज्याचे नाव “मदर जोन्सची औद्योगिक सेना” पडले होते, वाटेत आलेल्या विविध गावांमध्ये थांबला. मदर जोन्सना ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक आले.

जवळजवळ तीन आठवडे चालून मोर्चेकरी न्यूयॉर्क शहरात पोचले. त्या रात्री, न्यूयॉर्कच्या हजारो रहिवाशांनी मदर जोन्स आणि त्यांच्या अनुयायींना सेकंड ॲवेन्यू कडे मार्च करताना पाहिले. तीन दिवसांनी, मदर जोन्सनी कोनी बेटावरील एका मनोरंजन बागेत मोठ्या गर्दीसमोर भाषण केले. त्या म्हणाल्या, “आमची मागणी आहे की राष्ट्रपती रूझवेल्ट यांनी या मुलांचे आक्रोश ऐकावेत, ज्यांना कधीच शाळेत जाण्याची संधी मिळाली नाही”.

२८ जुलै रोजी मदर जोन्स नी तीन गिरणी कामगार मुलांना राष्ट्रपती रूझवेल्ट यांच्या घरी नेले. परंतु, त्यांना गेटच्या आत जाण्याची परवानगी मिळाली नाही. दुसऱ्या दिवशी, मदर जोन्स यांनी राष्ट्रपतींना एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी लिहिले की त्या राष्ट्रपतींशी ते सांगतील त्या वेळी बोलायला आनंदाने तयार आहेत. त्यांना राष्ट्रपतींची मदत गिरणी कामगार मुलांसाठी हवी होती. राष्ट्रपतींच्या सचिवाने उत्तर पाठवले की राष्ट्रपती कोणत्याही प्रकारची मदत करू शकत नाहीत.

न्यूयॉर्क मध्ये काही दिवस असेच घालवल्यानंतर, मोर्चेकरी घरी गेले. संप संपला, आणि मुले पुन्हा कामावर रुजू झाली. परंतु, मदर जोन्स आणि त्यांचे अनुयायी देशाचे लक्ष कामगार मुलांच्या प्रश्नाकडे वळवण्यात यशस्वी झाले होते. काही लोकांनी या घटनेला मदर जोन्स यांच्या मोठ्या उपलब्धींपैकी एक मानले. काही काळानंतर, बालकामगारांच्या प्रश्नांविषयी लोकांमध्ये जागरूकता वाढल्यामुळे काही सकारात्मक बदल घडले. १९३८ मध्ये अमेरिकेच्या कॉंग्रेसने मुलांना सुरक्षा प्रदान करणारा एक कामगार कायदा पारित केला - मुलांच्या मोर्च्याच्या ३५ वर्षांनंतर.

बालकामगारांच्या प्रश्नांकडे देशाचे लक्ष वेधून घेण्यामध्ये मदर जोन्स यांनी महत्वाची भूमिका निभावली. बालकामगारांच्या प्रश्नाविषयी जनतेची प्रतिक्रिया तीव्र होती. शेवटी, अमेरिकन काँग्रेसला मुलांच्या कामाच्या ठिकाणच्या सुरक्षेसाठी कायदे करावेच लागले.



एक धोकादायक स्त्री

मदर जोन्सनी शोषित कामगारांना मदत करण्यासाठी देशभर प्रवास करणे सुरु ठेवले. १९०५ मध्ये त्यांनी इंडस्ट्रीअल वर्कर्स ऑफ द वर्ल्ड (IWW) ही संस्था स्थापन करण्यात मदत केली. या संघटनेने कामगारांची कामाची परिस्थिती सुधारण्यासाठी वेगवेगळ्या उद्योगांमधील कामगारांना एकत्र आणले. या संघटनेच्या नेत्यांमध्ये मदर जोन्सच तेवढ्या महिला होत्या. कामगार संघटना धोकादायक असत. इतर स्त्रिया इतकी सक्रीय भूमिका निभावण्यासाठी पुरेशा शूर नव्हत्या.

कामगारांसाठी तीव्र लढा देणाऱ्या म्हणून मदर जोन्स प्रसिद्ध झाल्या होत्या. अनेक वृत्तपत्रे त्यांच्याबद्दल लिहीत आणि त्यांनी नेतृत्व केलेल्या संपाचे वृत्तांकन करीत. त्यांनी लेख लिहिले आणि देशभर फिरून कामगारांच्या बाजूने व्याख्याने दिली. अर्थात, सगळेच काही त्यांच्या कामाचे प्रशंसक नव्हते. काही लोक त्यांना अमेरिकेतील सर्वात धोकादायक स्त्री मानत होते. त्यांना त्या उपद्रवी आहेत असे वाटत होते.

१९१४ मध्ये, जेव्हा त्या ७७ वर्षांच्या होत्या, मदर जोन्सना कोलोराडो येथील खाणकामगारांच्या संपाला मदत केली म्हणून अटक झाली. त्यांना एक महिन्यासाठी कोर्टहाउसच्या तळघरात डांबून ठेवले होते.

IWW च्या नेत्यांपैकी मदर जोन्स या एक होत्या. या पोस्टर मध्ये या कामगार संघटनेने हाती घेतलेले काही महत्वाचे विषय दर्शवले आहे.





चित्रात दाखवलेल्या या बाईंनी १९१४ मध्ये मदर जोन्सना अटक झाल्यानंतर त्यांना पाठिंबा देण्यासाठी झालेल्या मोर्चात सहभाग घेतला होता.

जेल मधून सुद्‌धा, मदर जोन्स यांनी कामगारांना आणि वृत्तपत्रांना पत्र लिहीणे सुरु ठेवले. डेन्वर, कोलोराडो येथील एका वृत्तपत्राला लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी लिहिले, “अर्थातच मला जेल मधून बाहेर येण्याची तीव्र इच्छा आहे. सूर्यप्रकाशापासून दूर राहणे सुखद नाही.” पण जेल सुद्‌धा मदर जोन्सना कामगारांपासून दूर ठेवू शकली नाही. “मी माझ्या भूमिकेवर ठामपणे उभी आहे,” त्या म्हणत.

सरत्या वयात मदर जोन्स थकत चालल्या. त्यांना संधीवाताचे दुखणे होते. हा आजार अतिशय वेदनादायी असून तो सांधे आणि स्नायूंवर परिणाम करतो. परंतु, जरी त्या आता कामगारांमध्ये अधिक मिसळत नसल्या तरी त्यांची प्रसिद्‌धी कायम राहिली. १९२५ मध्ये त्यांनी त्यांच्या आयुष्याची गोष्ट लिहिली, जिचे नाव होते ‘द ऑटोबायोग्राफी ऑफ मदर जोन्स’. त्यांना आपल्या आयुष्याबद्‌दल बोलायला आवडत असे. १९३० च्या उन्हाळ्यात त्यांनी आपली शेवटची मुलाखत दिली. मदर जोन्सना विशेष अभिमान वाटत होता कारण अमेरिकेतील अनेक राज्ये बालकामगारांना संरक्षण देण्यासाठी कायदे बनवत होती. “आपण जिंकलो,” त्या म्हणाल्या.



मदर जोन्स यांचे स्मारक

“दोन्ही बाजूला त्यांच्या मुलांसोबत”

“भविष्य कामगारांच्या मजबूत हातांमध्ये आहे”

- मदर जोन्स

मदर जोन्स ३० नोव्हेंबर, १९३० रोजी मृत्यू पावल्या. त्या वेळी त्यांचे वय ९३ वर्षांचे होते. जिथे त्यांना पुरले, त्या इलीनोय येथील माउंट ओलिव्ह या खाणकामगारांच्या स्मशानभूमीमध्ये त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी हजारो लोक जमले होते. ही स्मशानभूमी १८९८ मध्ये झालेल्या संपात मृत्यू पावलेल्या कामगारांना समर्पित केलेली होती. मदर जोन्स यांनी सांगून ठेवले होते की “त्यांची इच्छा त्या शूर मुलांसोबत मातीखाली पुरले जाण्याची” आहे. त्यांनी आपले जीवन कामगारांच्या अधिकारांसाठी लढण्यात घालवले होते. कामगारांच्या हक्कांवरील त्यांच्या निर्भय विश्वासाने हजारो स्त्री, पुरुष, आणि मुलांना स्वत:च्या हक्कांसाठी लढण्यास प्रेरित केले. जर एकत्र लढले तर कामगार आपले जीवन बदलू शकतात हे मदर जोन्स यांनी सिद्ध केले.

तुम्हाला माहित आहे?

मदर जोन्सनी नेहमी मानले की त्यांचा जन्म १ मे, १८३० रोजी झाला. पण इतिहासतज्ञ मानतात की त्या १८३७ साली जन्मल्या.

मदर जोन्स यांनी समाजवादी पक्षासाठी सभापती (speaker) म्हणून काम पाहिले. समाजवाद्यांची मान्यता होती की समुदायांकडे जमीन, उद्योगधंदे आणि इतर व्यवसायांची मालकी असायला हवी. तरच सामुदायिक मालमत्तेतून उत्पादित धन/संपत्ती सर्व लोकांमध्ये वितरीत होऊ शकेल.

कोळसा खाणकामगार आणि गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या मुलांसोबत संघर्ष करण्या व्यतिरिक्त, मदर जोन्स यांनी ॲरिझोना येथील तांब्याच्या खाणीमध्ये काम करणारे मजूर, शिकागो मधील तारयंत्र चालवणारे कामगार, न्यूयोर्क मधील कापड कामगार, आणि मिलवौकीन, विसकॉन्सीन येथील दारूभट्टीवर काम करणाऱ्या कामगारांसाठी संघर्ष केला.

मदर जोन्स आपल्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेसाठी प्रसिद्ध होत्या. एकदा त्यांनी राष्ट्रपती थिओडोर रूझवेल्ट यांची यावरून चेष्टा केली की त्यांनी इतके सारे गुप्तहेर केवळ एक "म्हातारी बाई आणि काही मुलांच्या सैन्यावर" लक्ष ठेवण्यासाठी बाळगले आहेत. त्या पुढे म्हणाल्या, "तुम्ही लोक पण काय अद्भुत राष्ट्रपती निवडता! पुढच्या वेळी एखाद्या स्त्रीला या जागी निवडण्याचे चांगले कार्य करून बघा".

मदर जोन्सचे म्हणणे होते की जेव्हा स्त्रिया बोलू लागल्या तेव्हा त्यांना सत्ता मिळाली. त्या एकदा म्हणाल्या, "तुम्हाला मतांची गरज नसते... तुमच्याकडे विश्वास आणि आवाज असला पाहिजे!" गरिबांकडे पण श्रीमंतांएवढेच हक्क आणि संधी असल्या पाहिजेत, ही त्यांची इच्छा होती.

१९९२ मध्ये मदर जोन्सना वाशिंगटन, डी.सी. मधील अमेरिकन श्रम विभागाच्या हॉल ऑफ फेम मध्ये सामील केले गेले.



या चित्रामध्ये मदर जोन्स राष्ट्रपती केल्विन कूलिज यांच्यासोबत दिसत आहेत.

महत्वपूर्ण तारखा

१८३७ - मेरी हॅरीसचा कॉर्क, आयरलँड येथे जन्म झाला.

१८५७ - मेरी कॅनडा येथील टोरोंटो या शहरात टीचर्स कॉलेज मध्ये दाखल झाली.

१८५९ - मेरीने मिशिगन येथील मनरो या ठिकाणी स्थलांतर केले.

१८६० - मेरी प्रथम इलिनॉय येथील शिकागो येथे आणि नंतर टेनेसी येथील मेम्फिस येथे स्थलांतरित झाली.

१८६१ - मेरीने जॉर्ज जोन्स बरोबर लग्न केले आणि तिची आयर्न मोल्डर्स युनिअन सोबत ओळख झाली (वय २४)

१८६२ - मेरी आणि जॉर्ज ची पहिली मुलगी कॅथरीनचा जन्म झाला.

१८६३ - दुसरी मुलगी एलिझाबेथचा जन्म झाला.

१८६५ - मुलगा टेरेन्सचा जन्म झाला.

१८६७ - सर्वात लहान मुलगी, मेरीचा जन्म. यलो फीवर मुळे मेरीची चार ही मुले आणि नवरा, जॉर्ज चा ` मृत्यू झाला (वय ३०)

१८६८ - मेरीचे शिकागो ला स्थलांतर आणि कपडे शिवण्याच्या व्यवसायाची सुरुवात (वय ३१)

१८७१ - ग्रेट शिकागो फायर नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रचंड आगीत मेरीचा व्यवसाय नष्ट झाला. मेरी कामगारांच्या हक्काच्या लढाईत सक्रीय झाली.

१८७७ - रेलरोड कर्मचाऱ्यांचा पहिला राष्ट्रव्यापी संप सुरु झाला.

१८८० चे दशक - मेरी नाईट्स ऑफ लेबर या संघटनेत सहभागी झाली.

१८९० चे दशक - मेरी मदर जोन्स म्हणून ओळखली जाऊ लागली. तिने 'युनायटेड माईन वर्कर्स ऑफ अमेरिका' साठी काम करायला सुरुवात केली. खाणी असलेल्या गावांमध्ये प्रवास करून खाणकामगारांना संघटनेमध्ये सामील होण्याचे आवाहन करू लागली.

१९९४ - मदर जोन्स कापड गिरण्यांना भेटी देऊ लागली आणि बालकामगारांचे निरीक्षण करू लागली (वय ५७)

१९०३ - मदर जोन्स ने जुलै महिन्यात गिरणी कामगार मुलांच्या मोर्चाचे नेतृत्व केले.

१९०५ - मदर जोन्स ने जगभरातील औद्योगिक श्रमिकांनी संघटित व्हावे यासाठी काम केले.

१९१४ - कोलोराडो मध्ये खाणकामगारांच्या एका संपाच्या दरम्यान मदर जोन्स यांना तुरुंगवास झाला.

१९३० - ३० नोव्हेंबर रोजी मदर जोन्स यांचा वयाच्या ९३ व्या वर्षी मृत्यू झाला.